| | |
|---|---|
| MHSN060009292024 | Miraj City Police Station<br>PWDVA Appln./31/2024<br>Rupali Babaso Sakate Vs. Sachin Babaso Sakate |

## निशाणी ३६ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज जाबदार नं. १ यांनी कौटुंबिक हिंसाचार अधिनियम कलम २८ सह फौ.प्र.संहिताचे कलम ९१ व दिवाणी प्रक्रिया संहिताचे कलम ३० अन्वये कागदपत्रे हजर करणेकरीता साक्षीसमन्स काढणेकरीता दाखल केलेला आहे.

२. जाबदारतर्फे वकिल श्री. आय. बी. पालेगार आणि अर्जदारतर्फे श्री. एस. एस. वाटवे यांचा युक्तीवाद ऐकला.

३. जाबदार कथन करतात की, अर्जदार नं. १ ही मातोश्री तानूबाई दगडू खाडे पब्लीक स्कुल मालगाव, ता. मिरज, जि. सांगली येथे सहा. शिक्षीका या पदावर कार्यरत आहे. अर्जदार नं. १ यांचे असलेले वेतन पगारपत्र मे. कोर्टात अंतरिम पोटगीच्या अर्जाचे अनुषंगे आवश्यक आहे. त्याकरीता मुख्याध्यापक, मातोश्री तानूबाई दगडू खाडे पब्लीक स्कूल मालगांव, ता. मिरज, जि. सांगली यांना प्रस्तुत प्रकरणात सौ. रुपाली सचिन सकटे–सदामते यांचे जानेवारी २०२५ ते मे– २०२५ पर्यंतचे पगारपत्र न्यायालयात हजर करणेबाबत आदेश होणेकरीता विनंती केलेली आहे.

३. याऊलट अर्जदारतर्फे जाबदार नं. १ यांनी दाखल केलेल्या प्रस्तुत

अर्जास निशाणी ४२ प्रमाणे म्हणणे देऊन आक्षेप घेतला आहे. अर्जदार यांनी जाबदारच्या अर्जातील कथने नाकारली आहेत. अर्जदार कथन करते की, वास्तविक अर्जदार यांनी न्यायालयासमक्ष मातोश्री तानुबाई दगडू खाडे पब्लीक स्कूल येथील दाखला न्यायालयात हजर केलेला आहे. त्यामध्ये अर्जदार कामावर हजर झालेली दिनांक व त्यांना आजमितीस मिळणारा पगार नमूद केला आहे. त्यांचे अवलोकन केले असता नव्याने साक्षसमन्स काढण्याची आवश्यकता नाही. तसेच सद्यस्थितीला पुरावा सुरु नाही. त्यामुळे प्रतिवादीचा सदरचा अर्ज मंजूर करता येणार नाही. त्यामुळे जाबदार यांचा प्रस्तुतचा अर्ज फेटाळणेत यावा अशी विनंती केली आहे.

४. अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुतकामी अर्जदार हिने कलम २३ प्रमाणे अंतरिम अर्ज दाखल केलेला असून, सदरच्या अर्जावर अर्जदार व जाबदारतर्फे युक्तीवाद पूर्ण झालेला आहे. त्यानंतर सदरचे प्रकरण आदेशाकरीता प्रलंबित असताना जाबदार यांनी सदरचा अर्ज दाखल करुन अर्जदार ही काम करीत असलेल्या शाळेकडून तिचे पगारपत्रक मागविणेबाबत साक्षीसमन्स काढणेसाठी विनंती केलेली आहे. यातील जाबदार यांनी अर्जदार ही शाळेमध्ये शिकवत असलेबाबत फोटो हजर केलेले आहेत. त्यानंतर अर्जदार हिने सदर अर्जाचे कामी ती ज्या ठिकाणी काम करते त्या शाळेचा दाखला हजर केलेला असून, सदरच्या दाखल्यामध्ये सद्यस्थितीत तिला मिळणारा पगार नमूद केलेला आहे. प्रस्तुतचे प्रकरण हे अंतरिम अर्जाच्या आदेशाकरीता असून अंतरिम अर्जाच्या आदेशावेळी अभिलेखावरील पक्षकारांनी दाखल केलेली कागदपत्रे, शपथपत्रे यांचा प्रथमदर्शनी विचारात घेणे आवश्यक असते. यातील जाबदार यांनी सद्यस्थितीत साक्षीसमन्स काढणेबाबत विनंती केलेली आहे. परंतु सदरची विनंती ही पुराव्याच्या वेळी विचारात घेतली जाऊ शकते. सद्यपरिस्थीतीत वर नमूद केल्याप्रमाणे केवळ अभिलेखावरील कागदपत्रे व शपथपत्रे यांचा प्रथमदर्शनी विचार करणे आवश्यक असे आहे. सद्यपरिस्थीतीत जाबदार यांची

विनंती मंजूर करता येणार नाही. जाबदार यांना पुराव्याच्या वेळी अर्जदार हिच्या उत्पन्नासंदर्भात पुरावा देण्याची व त्याकरीता साक्षीसमन्स काढणेबाबत पूर्ण संधी आहे. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात येतो.

ANIRUDHA SUNIL RANE

Digitally signed by ANIRUDHA SUNIL RANE
Date: 2025.11.04 17:43:14 +0530

(अनिरुध्द एस. राणे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मिरज

ठिकाण –मिरज.
दिनांक –०३.११. २०२५.